अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- २२/११/२०२४

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३३/२०२४ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री सोमनाथ ज्ञानेश्वर उमाळे, नोकरी - महमूल सहायक, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कुर्ला कार्यालय, मुलुंड पश्चिम, मुंबई ८० |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ५,०००/- |
| पडताळणी दिनांक | दिनांक १६/०९/२०२४ रोजी |
| लाच स्विकारलेली रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे ते राहत असलेल्या गृहनिर्माण संस्थेत गैरकारभाराबाबत दप्तर तपासणी होण्याकरीता सन २०२० पासून उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा कार्यालयाकडे संविधानिक मार्गाने न्याय मागत आहेत. त्यानुसार दप्तर तपासणी होण्याकरीता शासकीय ऑडिटरची नेमणूक करण्यात आली होती. परंतु केलेला गैरकारभार उघडीस येण्याच्या भितीने नमूद संस्थेच्या व्यवस्थापक समितीने ताबा देण्यास नकार दिल्याने उपनिबंधक कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० अन्वये कारवाई होण्याकरीता तहसीलदार यांना पत्रव्यवहार केला होता. सदरहू पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दिनांक २२/०८/२०२४ रोजी तहसीलदार कार्यालयात जावून पाठपुरावा केला असता तेथील लोकसेवक श्री. सोमनाथ उमाळे यांनी तक्रारदार यांना ते नव्याने रूजू झाले असल्याने थोडया अवधीची गरज असल्याचे सांगून पुढील आठवडयात येण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक ०६/०९/२०२४ रोजी पुन्हा तहसीलदार कार्यालयात जावून लोकसेवक यांची भेट घेतली असता, लोकसेवक यांनी सदरहू काम लवकरात लवकर करण्याकरीता रू. ५,०००/- लाचेची मागणी करून दिनांक १२/०९/२०२४ रोजी येण्यास सांगितले. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनाक १२/०९/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द लेखी तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीवरून दिनांक १६/०९/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० अन्वये कारवाई करण्याकरीता अधिकारी यांची नियुक्ती आदेश निर्गमित करण्याच्या कामाकरीता रूपये ५,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व त्या रक्कमेचा गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन सोमनाथ ज्ञानेश्वर उमाळे, महसूल सहायक, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कुर्ला कार्यालय, मुंबई यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. गोकुळ बोरसे, पो.नि.

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

**टोल फ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :- acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :- acbwebmail@mahapolice.gov.in

**ईमेल** :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

**फेसबुक** :- www.facebook.com - Maharashtra ACB

**मोबाईल ॲप** :- www.acbmaharashtra.net